**कृपया प्रसिध्दीसाठी** **31 डिसेंबर 2008**

## खाजगी वन जमिनीवरील रहिवाश्यांना संरक्षण द्या-
## भाजपाची सर्वोच्च न्यायालयाच्या उच्चाधिकार समितीसमोर मागणी

**मुंबई, बुधवार :** "तथाकथित खाजगी वन जमिनीवरील पक्क्या इमारतींच्या रहिवाश्यांना तसेच झोपडपट्टीवासीयांना संरक्षण द्या " अशी आग्रही मागणी माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक व माजी खासदार डॉ. किरीट सोमय्या यांनी सर्वोच्च न्यायालयाने नेमलेल्या उच्चाधिकारी समितीकडे केली आहे. सदर समिती मुंबईत पाहणी करण्यासाठी आली असताना समितीचे अध्यक्ष श्री. पी.व्ही.जयकृष्णन आणि सदस्यद्वय श्री. महादेव व्यास आणि श्री. एस्. के.चढ्ढा यांनी आरे वसाहतीमधील न्यूझीलंड होस्टेल मध्ये खासगी वन जमिनीच्या संबंधीच्या निर्णयामुळे प्रभावित झालेल्यांचे म्हणणे ऐकून घेतले.

यासंबंधी अधिक माहिती देताना श्री.राम नाईक म्हणाले," महाराष्ट्र शासनाच्या खाजगी वन जमिनीसंबंधीच्या प्रकरणातून मुंबई,ठाणे परिसरातील लाखो नागरिक राहात असलेली पक्की घरे आणि झोपडपट्ट्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे बेकायदेशीर ठरल्या. त्या विरोधात भारतीय जनता पार्टी तसेच अन्य विकासक, जमीन मालक, कारखानदार, आदींनी सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले आहे. त्या अपीलाची सुनावणी चालू असताना प्रत्यक्ष वस्तुस्थिती पडताळून सर्वोच्च न्यायालयाला अहवाल देण्यासाठी उच्चाधिकार समिति नेमण्यात आली. त्या समितीने 30 डिसेंबर मुंबई-ठाणे येथील रोजी काही ठिकाणांना प्रत्यक्ष भेटी दिल्या आणि न्युझीलंड हॉस्टेलमध्ये सर्वांचे म्हणणे ऐकूनही घेतले. मुंबई,ठाणे परिसरातील तथाकथित वन जमिनीवर पक्क्या इमारतींच्या बरोबरच अनेक झोपडपट्टयाही वसलेल्या आहेत. त्या वस्त्यांना महाराष्ट्र शासनाने गलिच्छ वस्ती (स्लम) म्हणून कायदेशीर मान्यता दिलेली आहे, इतकेच नव्हे तर त्यांना केंद्र आणि राज्य सरकार तसेच महापालिकांच्या निधीतून पिण्याचे पाणी, शौचालये, गटारे, पक्क्या पायवाटा, वीज, शाळा आदी नागरी सुविधाही देण्यात आल्या आहेत. गलिच्छ वस्ती जाहीर करण्याचा अधिकार राज्य सरकारचाच आहे. असे असताना त्यांना आता हटवा असे म्हणणे सामाजिक न्यायाचे होणार नाही असे आम्ही भारतीय जनता पार्टीच्या वतीने उच्चाधिकार समितीला सांगितले. आमचा हा मुद्दा दखल घेण्यासारखा असून त्यासंबंधी अधिक माहिती सात दिवसाच्या आत पाठवावी असे समितीच्या अध्यक्षांनी सांगितले आहे."

"निवासी घरांच्या बरोबरच केंद्र सरकारचा अणुशक्ती विभाग, कामगार विमा रुग्णालय, महापालिका मंडई, शाळा, अग्निशमन केंद्र, इत्यादी आस्थापने तथाकथित खाजगी वन जमिनीवरतीच आहेत. तसेच 50 वर्षाहुन दीर्घकाळ चालणारे मुंबईतील काही औद्योगिक कारखाने या जमिनीवरती आहेत. त्यामुळे या सर्व बांधकामांचा एकत्रितपणे सर्वांगाने विचार करुन त्यांना संरक्षण देण्याची शिफारस उच्चाधिकार समितीने सर्वोच्च न्यायालयाला करावी" अशी मागणीही यासंबंधी आपले विचार व्यक्त करताना माजी खासदार डॉ. किरीट सोमय्या यांनी केली.

उच्चाधिकार समिती समोर काही बांधकाम व्यवसायिक, सहकारी गृहनिर्माण संस्था तसेच औद्योगिक कारखानदारांनी आपले म्हणणे मांडले. बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष श्री.पी.व्ही.जयकृष्णन यांनी समिति सर्व सूचनांचा विचार करुन सर्वोच्च न्यायालयाला अहवाल सादर करील असे सांगून अजूनही ज्यांना या प्रकरणी सूचना करावयाच्या असतील त्यांनी आपली निवेदने मेंबर सेक्रेटरी, सेंट्रल एम्पॉवरमेंट कमिटी, चाणक्य भवन, दुसरा मजला, चाणक्यपुरी, नवी दिल्ली 110 001 या पत्त्यावर पाठवावीत असे आवाहनही केले.

**(कार्यालय सचिव)**